# महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

जा.क्र.मऔविम/मुनि/P684477/२०२६ दिनांक :- 12/05/2026

## परिपत्रक

**विषय :- मऔवि महामंडळाच्या भूखंडावरील इमारतीचे उंची नुसार विकास कालावधी धोरणामध्ये सुधारणा करणेबाबत.**

संदर्भ :- १) महामंडळाचे परिपत्रक क्र.मऔविम/मुनि/P१९७३८२/२०२४, दि.१५.०३.२०२४.
२) महामंडळाचे परिपत्रक क्र.मऔविम/मुनि/I७०५२०/२०२४, दि.१२.०८.२०२४.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या औद्योगिक क्षेत्रातील माहिती व तंत्रज्ञान भूखंडांच्या विकास कालावधी बाबत महामंडळाने संदर्भांकित परिपत्रके दि.१५/०३/२०२४ आणि दि. १२/०८/२०२४ रोजी निर्गमित केलेली असून सदर परिपत्रकानुसार महामंडळाच्या औद्योगिक क्षेत्रातील माहिती व तंत्रज्ञान भूखंडासाठी विकास कालावधी इमारतीचे उंचीनुसार खालील प्रमाणे निश्चित करण्यात आले आहे.

तक्ता क्र. अ

| अ.क्र. | इमारतीची उंची | विकास कालावधी (वर्षे) |
|---|---|---|
| १. | ३६ मी पर्यंत | ३.० |
| २. | ३६ मी ते ७० मी | ४.० |
| ३. | ७० मी पेक्षा जास्त | ५.० |

वरील धोरण हे माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील IT Plot, निवासी व वाणिज्य भूखंडांकरिता लागू करण्यात आले आहे. परंतु महामंडळाच्या इतर औद्योगिक क्षेत्रातील इतर भुवापरांच्या भूखंडावरील इमारतीच्या ऊंची नुसार वरील प्रमाणे विकास कालावधी देणेबाबत संबंधित भूखंडधारकांकडून मागणी करण्यात येत आहे.

महामंडळाचे इतर औद्योगिक क्षेत्रातील व्यापारी, निवासी, Flatted industrial gala building, Pharmaceutical etc. वापराचे भूखंडावर देखील माहिती तंत्रज्ञान भूखंडावरील

इमारतीचे उंचीप्रमाणे/स्वरूपाचे बहुमजली इमारतींचे बांधकाम करण्यात येते. त्यामुळे, अशा भूखंडांवर देखील बांधकाम पूर्ण करण्यास अतिरिक्त कालावधी लागतो. सदर बाब विचारात घेता माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील IT Plot, निवासी व वाणिज्य भूखंडांकरिता लागू करण्यात आलेले उपरोक्त धोरण हे महामंडळाच्या इतर औद्योगिक क्षेत्रातील व्यापारी, निवासी, Flatted industrial gala building, Pharmaceutical etc. वापराचे भूखंडावर लागू करणे आवश्यक आहे. त्यामुळे इतर सर्व औद्योगिक क्षेत्रातील व्यापारी, निवासी, Flatted industrial gala building, Pharmaceutical etc. वापराचे भूखंडाकरीता इमारतीचे उंचीनुसार खालील तक्ता ब मध्ये नमूद केलेप्रमाणे विकास कालावधी देणेबाबतचा प्रस्ताव मा.सदस्य मंडळाचे बैठकीत सादर करण्यात आला होता.

तक्ता क्र. ब

| अ.क्र. | इमारतीची उंची | विकास कालावधी (वर्षे) | शेरा |
|---|---|---|---|
| १. | ३६ मी पर्यंत | ३ वर्ष | ज्या औद्योगिक क्षेत्रासाठी मूळ विकास कालावधी ३ वर्ष किंवा ३ वर्षांपेक्षा कमी आहे, त्या भूखंडांसाठी मूळ कालावधी लागू राहील. |
| २. | ३६ मी ते ७० मी | ३ वर्ष ६ महिने | ज्या औद्योगिक क्षेत्रासाठी मूळ विकास कालावधी ४ वर्षांपेक्षा अधिक असल्यास त्या भूखंडांसाठी तो कालावधी लागू राहील. |
| ३. | ७० मी पेक्षा जास्त | ४ वर्ष | |

वरील प्रस्तावाचे अनुषंगाने दि.२४.०३.२०२६ रोजीचे बैठकीमध्ये पुढील प्रमाणे ठराव क्र.७११८ पारीत करण्यात आला आहे.

*"ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या औद्योगिक क्षेत्रातील माहिती व तंत्रज्ञान भूखंडांच्या विकास कालावधी बाबत महामंडळाचे सदस्य मंडळाच्या दि.०६.०३.२०२४ रोजीच्या बैठकीत ठराव क्र. ६७९१ आणि दि.२९.०७.२०२४ रोजीच्या बैठकीत ठराव क्र.६८१८ पारित करण्यात आलेले धोरणामध्ये सुधारणा करून वरील तक्ता ब मध्ये नमुद केल्याप्रमाणे महामंडळाच्या इतर सर्व औद्योगिक क्षेत्रातील व्यापारी, निवासी, Flatted industrial gala building, Pharmaceutical etc. वापराचे भूखंडावर लागू करणेस मान्यता देण्यात येत आहे".*

इमारतीचे ऊंचीनुसार विकास कालावधी बाबत महामंडळाचे सदस्य मंडळाच्या दि.२४.०३.२०२६ रोजीच्या बैठकीतील निर्णयानुसार तक्ता "ब" मध्ये नमुद केल्याप्रमाणेचे

धोरण महामंडळाच्या इतर सर्व औद्योगिक क्षेत्रातील व्यापारी, निवासी, Flatted industrial gala building, Pharmaceutical etc. वापराचे भूखंडावर लागू करणेस मान्यता देण्यात आली असून त्यानुसार सर्व संबंधीतांनी नोंद घेऊन पुढील कार्यवाही करावी.

सदर परिपत्रक महाव्यवस्थापक (भूमी) यांचे सहमतीने आणि मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

(राजेंद्र पवार)
मुख्य नियोजक
म.औ.वि.म.,मुंबई-९३.

प्रति,

१. सर्व विभाग प्रमुख, मऔविम, मुंबई.
२. अतिरिक्त मुख्य अभियंता, मऔविम, पुणे/नांदेड/छ.संभाजीनगर/नागपूर.
३. सर्व अधिक्षक अभियंता, मऔविम.
४. सर्व प्रादेशिक अधिकारी, मऔविम.
५. सर्व कार्यकारी अभियंता, मऔविम.
६. सह मुख्य/उप मुख्य लेखाधिकारी, मऔविम, मुंबई/ पुणे/छ.संभाजीनगर/नागपूर.
७. महाव्यवस्थापक (भूमि)/ महाव्यवस्थापक(भूसंपादन), मऔविम, मुंबई.
८. प्रशासकीय अधिकारी, मऔविम, मुंबई.
९. व्यवस्थापक (भूसंपादन-१/२), मऔविम, मुंबई.
१०. जनसंपर्क अधिकारी, मऔविम, मुंबई.
११. सर्व क्षेत्र व्यवस्थापक, मऔविम, मुंबई.
१२. सर्व महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र.
१३. सर्व औद्योगिक संघटना.
१४. मुख्य मध्यवर्ती परिपत्रक नस्ती/मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम, कार्यालय मरोळ/एक्सप्रेस टॉवर, मुंबई.